# मंत्रिमंडळ निर्णय

**१३ ऑक्टोबर २०१६**

**( बैठक क्र. १०२ )**

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना (ठळक मुद्दे) | उच्च व तंत्र शिक्षण |
| २ | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (ठळक मुद्दे) | उच्च व तंत्र शिक्षण |
| ३ | पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना (ठळक मुद्दे) | आदिवासी विकास |
| ४ | धामणी मध्यम प्रकल्पाच्या ७८२ कोटी किंमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता | जलसंपदा |
| ५ | वारणा पाटबंधारे मोठा प्रकल्पाच्या ११७५ कोटी किंमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता | जलसंपदा |
| ६ | राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगासह जिल्हा मंचाच्या सदस्यांच्या मानधनात वाढ | अन्न, नागरी पुरवठा |
| ७ | मुंबई उच्च न्यायालयास फोर्टमध्ये दहा हजार चौरस फूट जागा | विधि व न्याय विभाग |

## राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना
## (ठळक मुद्दे)

- ईबीसी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सवलती आता वार्षिक सहा लाख उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांनाही मिळणार.
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईबीसी) विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी अधिक सुलभ करण्यासाठी राज्य सरकारचा क्रांतिकारी निर्णय.
- बारावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या ईबीसी वर्गातील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी कुटुंबाची उत्पन्न मर्यादा अडीच लाख करण्याचा राज्य शासनाचा निर्णय.
- यापूर्वी ईबीसी सवलतीसाठी पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा एक लाख इतकी होती.
- ईबीसी वर्गात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्य शासनाकडून शिक्षण शुल्कापोटी ५० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यात येते.
- याशिवाय अडीच लाखापेक्षा जास्त परंतु सहा लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या पालकांच्या गुणवंत मुलांनाही या सवलतीचा लाभ मिळणार आहे. त्यांचे निम्मे शिक्षण शुल्क राज्य शासनाकडून भरण्यात येणार आहे. यासाठी मात्र संबंधित विद्यार्थ्यास बारावी परीक्षेत किमान ६० टक्के गुण प्राप्त असावेत.
- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ईबीसी धारक विद्यार्थ्यांना सध्या देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठीही वार्षिक उत्पन्न मर्यादा अडीच लाख इतकी वाढविण्यात आली आहे.
- शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठांसह) आणि खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयात केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेणारे विद्यार्थी सवलतीस पात्र. व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेणारे तसेच खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्य विद्यापीठात शिकणारे विद्यार्थी या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत.
- वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय शिक्षण (MBBS & BDS) घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीयकृत अथवा शेल्युल्ड बँकेतून घेतलेल्या शैक्षणिक कर्जावरील व्याज शासन भरणार.

-----०-----

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

## (ठळक मुद्दे)

- ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी अथवा नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांना शासनाने निश्चित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना मोलाची ठरणार.
- या योजनेत शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालय अथवा तंत्रनिकेतनमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा निर्वाह भत्ता मिळणार.
- या योजनेत महानगरात (मुंबई महानगर क्षेत्र, पुणे, औरंगाबाद, नागपूर) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमहा तीन हजार रुपये (वार्षिक ३० हजार रुपये) तर या शहरांव्यतिरिक्त अन्य शहरात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमहा दोन हजार रुपये (वार्षिक २० हजार रुपये) वसतिगृह निर्वाह भत्ता मिळणार.
- या योजनेची अंमलबजावणी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासूनच. यापूर्वीच्या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही या वर्षापासून लाभ मिळणार.
- राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना आणि डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजनांचा लाभ राज्यातील सात लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना मिळणार असून राज्य शासनावर सातशे कोटींचा भार पडणार आहे.

-----०-----

आदिवासी विकास विभाग

## पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना

## (ठळक मुद्दे)

- शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना राबविण्याचा निर्णय.
- या योजनेंतर्गत २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षणासाठी भोजन, निवास आणि शैक्षणिक साहित्यासाठी थेट मदत मिळणार.
- जिल्हा, विभागीय मुख्यालय व मोठी शहरे या ठिकाणच्या शिक्षण संस्थांमध्ये चालू वर्षी बारावी नंतरचे उच्च शिक्षण घेणाऱ्या२० हजार विद्यार्थ्यांना ,तसेच पासून १८-२०१७कमाल४ ० हजार ५०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार.
- या विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये ही मदत थेट जमा होणार.
- मोठ्या शहरांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा महसुली विभागीय शहरांसाठी ,हजार ६ ५१०० आणि इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी ४३०० रुपये मदत देण्याचा निर्णय.
- यासाठी शासनावर प्रतिवर्षी १०७ कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे.
- याव्यतिरिक्त वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष पाच हजार आणि इतर शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष दोन हजार रुपये शैक्षणिक साहित्याच्या खरेदीसाठी दिले जाणार.

-----०-----

## धामणी मध्यम प्रकल्पाच्या ७८२ कोटी किंमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी, गगनबावडा आणि पन्हाळा तालुक्यातील डोंगराळ भागातील सिंचन, पिण्याचे पाणी आणि उद्योगासाठी आवश्यक असलेल्या धामणी मध्यम प्रकल्पाच्या ७८२.३७ कोटी रूपये किंमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

धामणी मध्यम प्रकल्प योजनेंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील धामणी नदीवर राई गावाजवळ १३३५ मीटर लांबीचे माती धरण बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा सर्वाधिक लाभ सिंचनासाठी होणार असून राधानगरी, पन्हाळा आणि गगनबावडा या तालुक्यातील १४०० हेक्टर क्षेत्रासह दुधगंगा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील उर्वरित ५४२७ हेक्टर क्षेत्राला त्याचा लाभ होणार आहे. धरणाच्या ३.८ अब्ज घनफूट पाण्यापैकी २.५३ अब्ज घनफुट पाणी केवळ सिंचनासाठी वापरण्यात येणार आहे. तर पिण्याच्या पाण्याच्या वापरासाठी ०.५० अब्ज घनफुट पाणी तर औद्योगिक कारणासाठी ०.७७ अब्ज घनफूट पाणी वापरता येणार आहे. तसेच या प्रकल्पातून ३ मेगा वॅट विद्युत निर्मिती करण्यात येणार आहे.

धामणी प्रकल्पास १९९५-९६ च्या दरसूचीनुसार १२० कोटी रूपये किंमतीच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. यानंतर २००३-०४ च्या दरसूचीवर आधारित ३२० कोटी रूपयांची प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. प्रकल्पाच्या ७८२.३७ कोटी किंमतीच्या द्वितीय सुधारित प्रकल्प अहवालास राज्य तांत्रिक सल्लागार समितीने शिफारस केली होती, ही शिफारस विचारत घेऊन त्यास मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

कोल्हापूर महापालिकेच्या पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणामुळे दुधगंगा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात झालेल्या ५४२७ हेक्टर सिंचन क्षेत्रातील कपातीची पुनर्स्थापना धामणी प्रकल्पाच्या माध्यमातून करण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

-----०-----

## वारणा पाटबंधारे मोठा प्रकल्पाच्या
## ११७५ कोटी किंमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता

सांगली व कोल्हापूर जिल्ह्यासाठी वरदान ठरणाऱ्या आणि ८७ हजार हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होऊ शकणाऱ्या वारणा प्रकल्पाचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी वारणा पाटबंधारे मोठा प्रकल्पाच्या ११७४.९८ कोटी इतक्या किंमतीस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील वारणा नदीवरील हा प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात वारणा नदीवर एकूण ९७४.१८८ द.ल.घ.मी. (३४.४० अ.घ.फू.) साठवण क्षमतेचे धरण बांधण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे सद्यस्थितीत ६३ हजार १४८ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असून कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील ८७ हजार हेक्टर क्षेत्रास यामुळे सिंचनाचा लाभ होणार आहे. वारणा धरणाचे काम पूर्ण झाले असून वितरण व्यवस्थेचे काम सुरू आहे. हा प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समाविष्ट झाला असून डिसेंबर २०१९ पर्यंत त्याचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

या प्रकल्पास १९६३-६४ च्या दरसूचीवर आधारित ३१.६४ कोटी रुपयांस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. यानंतर १९७५-७६ च्या दरसूचीवर आधारित ८१.९७ कोटी रुपयांस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तसेच १९८२-८३ च्या दरसूचीवर आधारित २८८.८७ कोटी रुपयांस व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेनंतर प्रामुख्याने दरसूचीत वाढ झाल्याने, भूसंपादन खर्चात वाढ झाल्याने, तसेच संकल्पनांतील बदल व व्दितीय सुधारित प्रकल्प अहवालातील अपुऱ्या तरतुदी यामुळे प्रकल्प किंमतीत वाढ झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने तृतीय सुधारित प्रकल्प अहवाल दिला होता. या प्रकल्प अहवालास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीची शिफारस आहे.

बांधकामाची सद्य:स्थिती, किंमत वाढीची कारणमिमांसा, राज्य तांत्रिक सल्लागार समितीचा अहवाल, व्यय अग्रक्रम समितीची निरिक्षणे तसेच प्रकल्पातील कामाच्या अनुषंगाने सिंचनविषयक विशेष चौकशी समितीच्या अहवालात नमूद केलेली निरीक्षणे व त्यानुसारची कार्यवाही यांचा विचार करून मंत्रिमंडळाने आज सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे.

-----o-----

अन्न, नागरी पुरवठा विभाग

**राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगासह**
**जिल्हा मंचाच्या सदस्यांच्या मानधनात वाढ**

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या सदस्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

या निर्णयानुसार राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या सदस्यांना प्रतिमाह ६२ हजार रूपये तर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या सदस्यांना प्रतिमाह ४० हजार रूपये एवढे एकत्रित मानधन देण्यात येणार आहे.

राज्य आयोगाचे अध्यक्ष व ११ सदस्य असे एकूण १२ पदाधिकारी आहेत. तसेच प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा मंचाची स्थापना करण्यात आली असून त्यामध्ये अध्यक्ष व दोन सदस्य असे एकूण तीन पदाधिकारी आहेत. राज्यात एकूण ४० जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच आहेत.

-----०-----

विधि व न्याय विभाग

**मुंबई उच्च न्यायालयास फोर्टमध्ये**
**दहा हजार चौरस फूट जागा**

मुंबईतील फोर्ट भागात असणाऱ्या सेंट्रल टेलिग्राफ ऑफिसच्या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सुमारे १० हजार चौरस फूट इतकी जागा मुंबई उच्च न्यायालयास ३६० रुपये प्रति चौरस फूट या दराने भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

यासाठी येणारा ५ कोटी १ लाख २८ हजार ५०० रुपयांचा वार्षिक आवर्ती खर्च तसेच या भाडेदरात प्रस्तावित ५ टक्के वार्षिक वाढ आणि जागा भाडेतत्वावर घेण्यासाठी अनामत म्हणून भरावयाची १ कोटी २५ लाख ३२ हजार १२५ रुपयांच्या अनावर्ती खर्चासह भाडेकरारनामा करण्यासाठी रजिस्ट्रेशन फी, स्टॅम्प ड्युटी इत्यादीसाठी येणाऱ्या अंदाजे ५० हजार रक्कमेस मान्यता देण्यात आली.

मागील काही वर्षात मुंबई उच्च न्यायालयाच्या कामकाजाचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. त्यामुळे सध्याच्या इमारतीतील जागा अपुरी पडु लागली होती. उच्च न्यायालयाच्या लगतच्या परिसरात असलेले केंद्रीय दूरसंचार मंत्रालयाच्या ताब्यातील तळमजल्यातील जागा यापूर्वीच देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर, दराने आणि अटी शर्तीने हा भाडेकरार करण्यात येणार आहे.

-----०-----